## कन्टेन्ट किएशन ॲन्ड ट्रेनिंग सेटअप कन्टेन्ट निर्मिती आणि ट्रेनिंग कामकाज

१. कन्टेन्ट किएशन ॲन्ड ट्रेनिंग सेटअप कन्टेन्ट निर्मिती आणि ट्रेनिंग कामकाज:

- गुगल : क्लेम नॉलेज पॅनल कीवर्ड टॅगिंग, इमेज बिल्डिंग, रिव्हयूज लिहीणे आणि आलेल्या रिव्हयूज व प्रश्नांचे उत्तर देणे, सर्व सोशल मिडिया अकाऊंट गुगल बरोबर लिंक करणे. व्हॉट्सॲप बिझनेस : व्हॉट्सअप हेल्पलाईनच्या बिझनेस प्रोफाईलचे ॲडव्हांस सेटअप करणे. ॲटोमॅटिक क्लिक रीप्लिझचा सेटअप करणे.
- सोशल मिडीया स्ट्रॅटेजीज सगळया सोशल मिडिया अकौंटसाठी कन्टेन्ट निर्मिती योजना. कन्टेन्ट निर्मिती व्हीडीओ, शॉर्ट क्लिप, रिल्स, फोटोग्राफी – फोटोग्राफी आणि व्हीडीओग्राफी मार्फत बसडेपो, प्रवाशी, कर्मचारी प्रवास चालू असतांना वेगवेगळया क्रियाकल्पांची सामग्री बनविणे.
- परिवहन महामंडळाचे नावे गुगल व्यवस्थापन - रचना / मांडणी करणे. परिवहन महामंडळाचे नावे व्हॉटस्ॲप बिझनेस ॲपची रचना / मांडणी करणे व हाताळणे. मुद्देनिहाय विषय / सामग्री निर्मीती (Content Creation)-- Trending, Advanced, Viral, Emotion, Engagment.
- छायाचित्रण कार्यक्रम, कार्यक्रमांची प्रक्षेपणे.
- व्हिडीओज (Videos) – फोनद्वारे सर्व कार्यक्रमांचे शुटींग करणे, कार्यक्रमांचे व्यावसायिक शुटींग, स्टोरीजचे व्यावसायिकरीत्या शुटींग. शॉर्ट व्हिडीओज आणि रिल्स.
- Campaign Concepts – आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

२. आपले संस्थेने ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये कामकाज करावयाचे आहे. यदाकदाचित सदर कामकाजामध्ये व्यत्यय निर्माण झाल्यास, परिवहन महामंडळाने ठरवून दिलेले काम वेळेत पुर्ण न केल्यास अथवा कामामध्ये काही त्रुटी अथवा उणीवा आढळल्यास प्रतिदिन रक्कम रू. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) दंड आकारण्यात येईल. सदरचा दंड त्यांच्या मासिक बिलामधून वसूल करण्याचा सर्वस्वी अधिकार परिवहन महामंडळास राहील.

३. Disclaimer (अस्विकरण) : परिवहन महामंडळाची जनमानसात प्रतिमा उंचाविणे हा मुख्य उद्देश असून त्याकरिता प्रवासी, नागरिक इ. च्या जाती, धर्म विषयक भावना दुखावणार नाहीत याची संपुर्ण काळजी आपले संस्थेची राहील.

४. Confidential (गोपनीयता) : परिवहन महामंडळाच्या सेवेबाबत करण्यात येणाऱ्या कामकाजासाठी गोपनीयता बाळगायची आहे. सदरच्या माहितीचा दुरुपयोग होणार नाही याची संपुर्ण काळजी घ्यावयाची आहे.

५. कामकाजाच्या दिलेल्या कालावधीमध्ये काही विवाद निर्माण झाल्यास त्याबाबतीत निर्णय घेण्याचे व आवश्यक ते बदल करण्याचे सर्व अधिकार परिवहन महामंडळाचे मा. सहव्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

६. मासिक कामकाज आढावा पुणे महानगर परिवहन महामंडळाचे कामगार व जनता संपर्क अधिकारी यांचेकडे प्रत्येक महिन्याचे १० तारखेपर्यंत आपले संस्थेने सादर करावयाचा आहे.

७. जे दर दरपत्रकात नमूद केले आहेत ते कामाची मुदत संपेपर्यंत बंधनकारक राहतील व दरपत्रकातील रक्कमेव्यतिरिक्त जादाचे कोणतेही बिल महामंडळाकडून अदा केले जाणार नाही.